# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

४ ब, बी.जे.रोड, पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र.२६१३३८३३, २६१३९३००

PDCC BANK

*** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,पुणे ***

## जाहिरात

*** लेखनिक पदाच्या भरतीसाठी ऑनलाईन परिक्षेबाबत सविस्तर माहिती ***

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे या बँकेकरीता लेखनिक हुद्दयाची रिक्त पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून निवड सूची तयार करणेसाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. बँकेचे संकेत स्थळ: **https://pdccbank.co.in/careers/** व **https://punedccbank.in**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेत स्थळावर अर्ज भरणे | दि.०७.०८.२०२१ ते दि. १६.०८.२०२१ रोजी पर्यंत |
| २. | ऑनलाईन परिक्षा शुल्क स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.०७.०८.२०२१ ते दि. १७.०८.२०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत. |
| ३. | ऑनलाईन परिक्षा शुल्क भरणा माहिती संकेत स्थळावर अद्ययावत(Update) करण्याची अंतिम दिनांक | दि.०७.०८.२०२१ ते दि. १८.०८.२०२१ रोजी पर्यंत |
| ३. | ऑनलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५. | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |

*** सूचना ***

१) ऑनलाईन परिक्षा शुल्क संकेत स्थळावर अद्ययावत (Update) केल्या शिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

२) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा शुल्काची रक्कम पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कोणत्याही शाखांमध्ये चलनाद्वारे भरणा करता येईल.

३) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरताना त्यांनी स्वतःचा ईमेल-आयडी,मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.

४) उमेदवारांनी अर्ज भरताना लेखनिक पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.

५) **सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

लेखनिक पदाच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमदेवारांकडून ऑनलाईन अर्ज विहित नमून्यात सादर करण्यासाठीचे पात्रता, निकष व इतर तपशिल खालीलप्रमाणे...

## अ) शैक्षणिक अर्हता :

| पदाचे नाव | पदसंख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| लेखनिक | ३५६ | किमान २१ वर्ष<br>व<br>कमाल ३८ वर्षे | उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किमान ५०% गुणाने उत्तीर्ण असावा.<br>**आणि**<br>उमेदवार एम.एस.सी.आय.टी. किंवा शासन मान्यता प्राप्त संस्थेचे किमान ९० दिवसांचे तत्सम संगणक प्रमाणपत्र प्राप्त असावा. (संगणक पदवी असल्यास अट शिथिल) |

१) दि.३०.०६.२०२१ रोजी उपरोक्त वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

२) उपरोक्त रिक्त ३५६ पदांची संख्या कमी करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे. तसेच सदर भरती प्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

## ब) वेतन श्रेणी :

| | |
|---|---|
| लेखनिक | २४५-२०-३०५-२५-४३०-३०-५८०-३५-७५५-४०-९५५-४५-११८०-५०-१४३०-५५-१७०५-५५-१९८० |
| | अंदाजे एकत्रित वेतन रु.२२,०००/- व बँकेच्या नियमानुसार लागू असणारे भत्ते. |

## क) निवड कार्यपध्दती :

### १) ऑनलाईन परिक्षा :

लेखनिक श्रेणीतील पदांकरीता ९० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. ऑनलाईन परिक्षेसाठी खालील विषयांच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश असेल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

| अ.क्र | विषयाचे नाव | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | बँकींग व सहकार | ३० |
| २ | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | २० |
| ३ | कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था | १० |
| ४ | मराठी भाषा ज्ञान | १० |
| ५ | संगणक व माहिती तंत्रज्ञान | १० |
| ६ | बुद्धीमापन चाचणी | १० |
| | **एकूण गुण** | **९०** |

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.

२) <u>कागदपत्रे पडताळणी व मुलाखत :</u>

ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे उपरोक्त नमूद पद संख्येच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची आसन क्रमांक निहाय यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर मुलाखतीस पात्र उमेदवारांस मुलाखतीपुर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी व मुलाखतीस ऑनलाईन पद्धतीने मुलाखतपत्र उपलब्ध करुन दिले जाईल. सदर मुलाखतपत्र ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावरुन डाऊनलोड करावे. मुलाखतपत्र डाऊनलोड करण्यास अडचण निर्माण झाल्यास **support@punedccbank.in** या ई–मेल द्वारे व **9511262588, 7517824568** या हेल्पलाईनद्वारे संपर्क साधावा. कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र होईल.

३) <u>मुलाखत :</u>

कागदपत्रे पडताळणीमध्ये मुलाखतीस पात्र होणाऱ्या उमेदवारांची बँक गठीत समितीकडून मुलाखत घेण्यात येईल. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही. सदर मुलाखत १० गुणांची असून सदर गुणांचे भारांकन बँक धोरणानुसार असेल. त्यामध्ये १० पैकी ५ गुण संबंधित उमेदवारांच्या खालील शैक्षणिक पात्रतेनुसार देण्यात येतील व उर्वरित ५ गुण मौखिक मुलाखतीसाठी देण्यात येतील.

**मुलाखतीतील शैक्षणिक अर्हतेसाठी ५ गुणांचे गुण भारांकन खालील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | गुणांचे भारांकन |
|---|---|---|
| १ | कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी | १ |
| २ | विशेष पदवी (बी.कॉम,बीएससी ॲग्री व संलग्न /बीव्हीएससी ॲन्ड एएच, बीई/ बीटेककॉम्प्युटर/आयटी,बीसीएस,बीबीए,एलएलबी ) | १ |
| ३ | एचडीसीएम/डीसीबीएम | १ |
| ४ | जीडीसी ॲन्ड ए | १ |
| ५ | मराठी व इंग्रजी टायपिंग शासकीय प्रमाणपत्र धारक (प्रत्येकी १/२ गुण) /स्टेनोग्राफर (शासकीय प्रमाणपत्र धारक) | १ |
| | **एकूण गुण** | **५** |

४) <u>उमेदवारांची अंतिम निवड सूची :</u>

उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण यांची बेरीज करुन एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे गुणांसह अंतिम निवड सूची व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे ३५६ पद संख्या विचारात घेता, अंतिम निवडसूची व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांमध्ये पुणे जिल्हयातील उमेदवार, उमेदवार धारण करीत असलेली उच्च/शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयाची सेवाजेष्ठता व आडनावाच्या इंग्रजी अक्षरांनुसार याक्रमाने प्राधान्य देऊन अनुक्रमे उमेदवारांची यादी मर्यादित करण्यात येईल.

त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे/गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या लेखनिक हुद्दयाच्या पदी परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.

PUNE DIST. CENTRAL CO-OP. BANK LTD. H.O. 4, B.J. ROAD, PUNE-1.